MHKO190005562024

**निशाणी क्रमांक ४ खालील आदेश**

**म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र.१६/२०२४**

**तन्वी उर्फ प्रन्वी प्रणवगिरी पालकर वि. प्रणवगिरी चंद्रशेखर पालकर व इतर**

**(दिनांकः१६/०३/२०२६)**

१. प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ मधील कलम २३ अन्वये अंतरीम पोटगी मिळणेकरीता सादर केला आहे.

**अर्जदार हिची अर्जातील थोडक्यात कथनेः-**

२. अर्जदार व वि.प.नं.१ यांचा दिनांक २२.०५.२०२३ इ. रोजी हिंदू धर्म शास्त्रानुसार व रितीरीवाजानुसार झालेला होता व आहे. यातील वि.प.नं.२ व ३ या अर्जदार हिच्या नात्याने अनुक्रमे सासू व नणंद आहेत. लग्नानंतर सुरूवातीचे दोन महीने वि.प. हे अर्जदार हिचेशी व्यवस्थित वागले. त्यानंतर वि.प.नं.१ ने अर्जदार हिचेशी कोणत्याही कारणाशिवाय भांडण काढून तिला त्रास देणेस सुरूवात केली. वि.प.नं.२ व ३ या देखील अपमानास्पद वागणुक देवु लागल्या. तसेच वि.प हे अर्जदार हिला घरातील व जणावरांचे गोठ्यातील सर्व कामे लावत असत. वि.प.नं.१ याने अर्जदार हिला ''तुला वशीकरण करुन मी तुझ्याशी लग्न केले आहे'', ''तु तुझ्या घरी जा, मी तुझ्याशी बदला घेणेसाठी लग्न केले होते, मला आता तुझ्यासोबत राहायचे नाही'' असे वारंवार बोलुन अर्जदारचा मानसिक छळ केला. वि.प.नं.१ हा रात्री अपरात्री येवुन अर्जदार हिला शिवीगाळ व मारहाण करत असे. दिनांक ०३.०५.२०२४ रोजी वि.प यांनी अर्जदार हिला जीवे मारण्याची व आयुष्य बरबाद करण्याची धमकी दिली. तसेच अर्जदारच्या संमतीशिवाय वि.प.नं.१ ने तिच्या नावे सोशल मिडीयावर अकाऊंट सुरू करुन त्यावर

अर्जदारचे फोटो व्हायरल करत आहे व तिची सोशल मिडीयावर बदनामी करणेची धमकी दिलेली आहे. वि.प.नं.१ याच्या वागणेवरुन त्याला अर्जदार हिचेशी संसार करणेची इच्छा असलेचे दिसून येत नाही. वि.प. यांनी अर्जदार हिचा शारीरीक व मानसिक छळ करुन कौटूंबिक हिंसाचार या सदरातील गंभीर स्वरुपाचा अपराध केलेला आहे.

३. अर्जदार हिचे कथन पुढे असे की, ती माहेरी आल्यानंतर वि.प.नं.१ ने अर्जदारची कोणतीही विचारपूस केलेली नाही अगर तिच्या पालनपोषणाची, औषधोपचाराची कोणतीही जबाबदारी पार पाडलेली नाही. अर्जदार या स्वतःचे पालनपोषण करणेस असमर्थ आहेत. याउलट वि.प यांचा वैभववाडी येथे हार्डवेअरचा व्यवसाय असुन त्यातून महीना रक्कम रु.१,००,०००/– (एक लाख) इतके वि.प यांना उत्पन्न मिळते. वि.प यांची बागायत शेतजमीन असुन त्यातून देखील त्यांना वार्षिक रक्कम रु.५,००,०००/– इतके उत्पन्न मिळते. तसेच वि.प यांचा दुग्धव्यावसाय असुन त्यातुन वि.प यांना महिना रक्कम रु.६०,०००/– इतके उत्पन्न मिळते. अर्जदार त्यांच्या माहेरी राहात असुन वि.प.नं.१ ने अर्जदार हिच्या पालनपोषाणी कोणतीही सोय केलेली नाही. त्यामुळे अर्जदार हिला प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. शेवटी, अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. वि.प. यांनी नि.क्र.१३ कडे त्यांचे म्हणणे दाखल केले. वि.प यांनी त्यांचे म्हणणेमध्ये अर्जदार हिचेशी असलेले नाते संबंध वगळता अर्जातील इतर सर्व कथने नाकारली आहेत. वि.प यांचे कथन असे की, अर्जदार व वि.प.क्र.१ यांचा प्रेम विवाह असुन त्यांनी अर्जदार हिला त्रास होईल असे कोणतेही कृत्य केलेले नाही अगर तिला कोणतीही वाईट वागणुक दिलेली नाही. केवळ वि.प यांना त्रास देणेकरीता व त्यांची बदनामी करण्याच्या हेतूने अर्जदार हीने प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केलेला आहे.

वि.प.क्र.१ हा सध्यस्थितीत कोणताही कामधंदा करत नाही. वि.प.क्र.१ हा अर्जदार क्र.१ हिस नांदविणेस तयार आहे. वि.प. यांनी अर्जदार हिचा कधीही त्याग केलेला नव्हता व नाही. अर्जदार ही स्वतःच्या मर्जीने तिच्या माहेरी राहात आहे. अर्जदार यांच्या कथनाप्रमाणे प्रस्तुत अर्जास कोणतेही कारण घडलेले नाही. सबब, वि.प. यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

५. अर्ज व म्हणणे मधील कथनांचे अवलोकन केले असता माझ्यासमोर खालील विचाराधीन प्रश्न उत्पन्न झालेले आहेत. त्यावरील कारणमिमांसा निष्कर्षासह पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **विचाराधीन प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही प्रथमदर्शनी हे सिध्द करते काय की, वि.प. याने तिचे विरुध्द कौटुंबिक हिंसाचार केला आहे? | होकारार्थी. |
| २. | अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्याकरीता पात्र आहे काय? आहे तर, किती ? | अंशतः होकारार्थी. ( अर्ज दाखल केले तारखेपासून दरमहा रु.५०००/- प्रमाणे) |
| ३. | काय आदेश? | अर्ज अंशतः मंजुर करण्यात आला. |

६. अर्जदार व वि.प तर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

७. अर्जदार व वि.प. यांनी अनुक्रमे नि.क्र.१४ व १५ कडे त्यांची मालमत्ता व

जबाबदारीची शपथपत्रे दाखल केली आहेत. तसेच वि.प.नं.१ याने नि.क्र.१६ कडे त्याचे कृषी तपशिलाबाबतचे ॲफिडेव्हीट दाखल केले आहे. संरक्षण अधिकारी यांनी नि.क्र.१७ कडे कौटुंबिक घटना अहवाल सादर केला आहे.

**<u>विचाराधीन प्रश्न क्र.१ बाबत</u> :–**

८. अर्ज व अभिलेखावरील उपलब्ध पुराव्यावरुन अर्जदार व वि.प.नं.१ यांना त्यांचे वैवाहीक नाते संबंधाबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे दिसुन येते. तसेच अर्जदार ही सध्या तिच्या माहेरी राहात असल्याबाबत देखील दोन्ही पक्षकारांमध्ये कोणतेही मतभेद नाहीत. सबब, अर्जदार ही वि.प.नं.१ याचेपासुन विभक्त राहात असल्याचे दिसुन येते. अर्जदार व वि.प यांनी एकमेकांवर केलेले आरोप हे अंतिम आदेशाचे वेळी शाबीत होणार आहेत. त्यामुळे त्याबाबत प्रस्तुत अंतरिम अर्जाच्या सुनावणीवेळी उहापोह करणे उचीत होणार नाही.

९. अर्जदार हिच्या कथनांप्रमाणे ती सध्या तिच्या माहेरी राहत आहे. तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तसेच वि.प याने देखील तिच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केलेली नाही. त्यामुळे अर्जदार हिला तिच्या माहेरच्या लोकांवर विसंबुन राहुन जीवन व्यतीत करावे लागत आहे. वि.प याने त्याच्या कथनामध्ये अर्जदार ही तिच्या माहेरी राहात असल्याचे कबुल केले आहे. वि.प याने अर्जदार हिचा पती या नात्याने तिच्या उदरनिर्वाहाची सोय केली असल्याचे त्याच्या कथनांमध्ये कोठेही कथन केलेले नाही. वि.प याने त्याच्या म्हणणेमध्ये तो अर्जदार हिला नांदविणेस तयार आहे असे कथन केले आहे. परंतु अर्जदार हिला नांदविणेसाठी त्याने प्रयत्न केले होते हे दर्शविण्यासाठी कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

१०. अभिलेखावर उपलब्ध पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदार ही तिच्या माहेरी राहात आहे. एक भारतीय विवाहीत महिला कोणतेही कारण नसताना तिच्या पतीचा त्याग करेल हे प्रथमदर्शनी विश्वसनीय दिसुन येत नाही. वि.प याने दाखल केलेल्या म्हणणेवरुन अर्जदार हिचे कथन अमान्य करण्यास पुरेसे कारण नाही. भारतीय संस्कृतीनुसार पतीने पत्नीच्या उदरनिर्वाहाची सोय करणे आवश्यक आहे. अर्जदार हिची पत्नी म्हणुन पालनपोषण करण्याची जबाबदारी वि.प. याची आहे. अर्जदार हिच्या अर्जातील व वि.प याच्या म्हणणेमधील कथनांवरुन हे स्पष्ट होते की, अर्जदार ही दिनांक ०३/०५/२०२४ रोजी पासून विभक्त राहात आहे व तेंव्हापासून वि.प याने तिची कोणतीही जबाबदारी स्विकारलेली नाही अथवा तिच्या उदनिर्वाहाची कोणतीही सोय केलेली नाही. तसेच प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यापासून देखील वि.प याने अर्जदार हिच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केलेली नाही. त्यामुळे अर्जदार हिला इतरांवर विसंबुन राहून आपले जीवन व्यतीत करावे लागत आहे. वि.प याची सदरची कृती ही कौटूंबिक हिंसाचार म्हणुन गृहीत धरली तर अनुचीत होणार नाही. तसेच वि.प याने अर्जदार हिचे विरुध्द कौटूंबिक हिंसाचार केला होता हे अर्जदारचे कथन नाकारण्यास कोणतेही कारण नाही. सबब, मी विचाराधीन प्रश्न क्र.१ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>विचाराधीन प्रश्न क्र.२ बाबतः–</u>**

११. अर्जदार हिने असे कथन केले आहे की, वि.प यांचा वैभववाडी येथे हार्डवेअरचा व्यवसाय असून त्यातून त्यांना महीना रक्कम रु.१,००,०००/– इतके उत्पन्न मिळते. तसेच वि.प यांची बागायत शेतजमीन असून त्यातून देखील त्यांना वार्षिक रक्कम रु.५,००,०००/– इतके उत्पन्न मिळते. त्याच बरोबर वि.प.नं.१ याचा जनावरांचा

गोठा असून दुग्ध व्यवसायामधून देखील त्यांना महिना रक्कम रु.६०,०००/- इतके उत्पन्न मिळते. अर्जदार हिने तिच्या उपरोक्त वि.प च्या उत्पन्नाबाबतच्या कथनांच्या बळकटीकरीता इतर कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. परिणामी, अर्जदारच्या वरील कथनांवर विसंबून राहून वि.प च्या उत्पन्नाबाबत निष्कर्ष काढणे उचीत होणार नाही.

१२. वि.प याने तो सध्यस्थितीमध्ये कोणताही कामधंदा करत नसल्याचे कथन केले आहे. असे असले तरी अर्जदार हिचा पती म्हणुन तिचे पालनपोषण करण्याची वि.प.नं.१ ची नैतीक व कायदेशीर जाबाबदारी आहे. अशा परिस्थितीमध्ये वि.प. याचे वय व त्यांची शारीरीक क्षमता विचारात घेता त्याला प्रति महिना रक्कम रु.१५,०००/- ते रु.२०,०००/- इतके उत्पन्न मिळविण्यास कोणतीही अडचण नाही. वि.प याने त्याच्या म्हणणेमध्ये वि.प.क्र.२ ही नोकरी करत असल्याचे कथन केले आहे. तसेच त्याने त्याच्या म्हणणेमध्ये वि.प.क्र.२ व त्याचे वडील त्याचा सांभाळ करत असल्याचे कथन केले आहे. तसचे वि.प याने त्याच्या मालमत्ता व जबाबदारीच्या शपथपत्रामध्ये त्याच्यावर इतर कोणीही अवलंबून नसल्याचे कथन केले आहे. यावरुन वि.प याच्यावर अर्जदार हिचे व्यतीरीक्त इतर कोणीही अवलंबून नसल्याचे दिसुन येते.

१३. अर्जदार व वि.प यांची परिस्थिती तसेच अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता वि.प ची अर्जदार हिला पती म्हणुन सांभाळण्याची जबाबदारी आहे. वर नमुद चर्चीले प्रमाणे वि.प हा अर्जदार हिचा सांभाळ करत नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे त्यासंदर्भात आदेश पारीत करणे आवश्यक आहे. पोटगीची रक्कम ठरविताना ती अल्पहीन नसावी तसेच भोगविलासी जीवन व्यतीत करण्याइतपतही नसावी. अर्जदार व वि.प यांची कौटूंबिक, आर्थीक व सामाजीक परिस्थिती विचारात घेता, तसेच अर्जदार

हिच्या दैनंदिन गरजांचा, राहणीमानाचा व आजच्या जीवनावश्यक वस्तुंच्या किमतींचा विचार करता अर्जदार हिला दरमहा रक्कम रु.५०००/–(रुपये पाच हजार फक्त) इतकी अंतरीम पोटगी मंजुर करणे न्यायोचीत होईल. सबब, मी विचाराधीन प्रश्न क्र.२ चे निष्कर्ष अशंतः होकारार्थी नोंदवित आहे.

**विचाराधीन प्रश्न क्र.३ बाबत:–**

१४. वर नमुद चर्चा व विचाराधीन प्रश्न क्र.१ व २ चे निष्कर्ष यांना अनुसरुन विचाराधीन प्रश्न क्र.३ करीता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात आला.

२. वि.प. यास असा आदेश देण्यात येतो की, त्याने प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासुन अर्जदार हिला दरमहा रक्कम रु.५०००/–(रुपये पाच हजार फक्त) इतकी अंतरीम पोटगी द्यावी.

३. सदर आदेशाची प्रत अर्जदार व वि.प. यांना विनामुल्य देणेत यावी.

RAJENDRA DHANAJI SHINDE
Digitally signed by RAJENDRA DHANAJI SHINDE
Date: 2026.03.17 11:02:33 +0530

**(आर.डि.शिंदे)**

ठिकाण : राधानगरी
दिनांक:१६/०३/२०२६

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी
राधानगरी.